# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 07.10.2023 वार – शनिवार

---

**<u>प्रधान</u>**

आगामी काही वर्षात भारताची अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर अव्वल स्थानावर येणार आहेच पण त्यावेळी त्यातील गुणवत्ता आणि सर्वसमावेशकता कायम राखण्याचे मोठे आव्हान युवकांसमोर राहणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण आणि कौशल्य विकास तसंच उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान यानी आज पुण्यात केलं.

पुण्यातील गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्था या अभिमत विद्यापीठाच्या 29 व्या वार्षिक दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी एकंदर 280 जणांना प्रधान यांच्या हस्ते विविध विद्या शाखेतील पदवी पदविका प्रदान करण्यात आली.

राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी बोलताना मराठा आरक्षण, शेतकरी आत्महत्या या विषयांच्या अभ्यासात गोखले अर्थशास्त्र संस्थेनं दिलेल्या मोलाच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करून आगामी काळात राज्याच्या शाश्वत आणि सर्वांगीण विकासाबरोबरच आरोग्य क्षेत्राच्या सुधारणांसाठी संस्थेची मदत लागणार असल्याचं स्पष्ट केलं. संस्थेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या पुस्तकाचं प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं.

पदवीदान समारंभानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना सांगितलं की नव्या शिक्षण धोरणातील बाल वाटिका या अभिनव संकल्पनेसह विविध योजनांची देशाच्या अनेक भागात अमलबजावणी सुरू झाली असून लवकरच देशभर त्याचा प्रसार होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. नव्या धोरणाची अंमलबजावणी करताना शिक्षण हक्क कायद्याचा त्यात कोणताही अडसर येत नाही असं सांगून या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारची असल्याचं देखील ते म्हणाले.

दरम्यान, अधिकाधिक उच्च शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून मूल्यांकन करून घ्यावे यासाठी या प्रक्रीयेत काही सुधारणा करण्यात याव्या अशी विनंती चंद्रकांत पाटील धर्मेंद्र प्रधान यांना आज पत्राद्वारे केली आहे.

**<u>ससून</u>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार पुण्याचे विभागीय आयुक्त सौरभ राव आणि जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी काल उशिरा ससून सर्वसाधारण रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली आणि कोणत्याही प्रकारच्या आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यास रुग्णालय प्रशासन कितपत सज्ज आहे याचा आढावा घेतला. यासंदर्भातील अंतिम अहवाल येत्या दोन दिवसात राज्य शासनाला सादर केला जाणार असल्याचं राव यांनी सांगितलं. ससून रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागात दररोज किमान 2 हजाराहून अधिक रुग्णांची तपासणी केली जाते तर 350 हून अधिक रुग्ण दररोज नव्यानं भरती होत असतात.

**<u>ससून</u>**

ससून रुग्णालयात दाखल प्रत्येक कैदी रुग्णांच्या प्रकृतीचा आढावा तातडीने घ्यावा. कैदी नेमका उपचाराच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याची तज्ज्ञ डॉक्टरांकडून माहिती घ्यावी. तसंच, उपचार पूर्ण झालेल्या कैद्यांची तातडीनं परत कारागृहात रवानगी

करावी, असे आदेश बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर संजीव ठाकूर यांनी दिले आहेत. अमली पदार्थ तस्करीतील मुख्य सूत्रधार ललित पाटील हा शस्त्रक्रियेच्या आदल्या दिवशीच ससून रुग्णालयातून फरार झाला होता, त्या पार्श्वभूमीवर ही दक्षता घेण्यात येत आहे.

**पुल**

पुण्यातील घोरपडी इथल्या रेल्वे क्रॉसिंगमुळे सातत्यानं होणारी वाहतूक कोंडी लवकरच दूर होणार आहे. या चौकात पुणे महापालिकेतर्फे उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. त्यासाठी संरक्षण मंत्रालयाची मान्यता मिळाली असून रेल्वेची मान्यता अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे महापालिकेनं या परिसरात 47 कोटी रुपये खर्चून रेल्वे मार्गावर उड्डाणपूल उभारण्यास मान्यता दिली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनी दिली.

**रबी**

बारामती कृषी विभाग आणि कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीनं आयोजित रबी हंगाम प्रशिक्षण कार्यशाळेअंतर्गत 'कृषी मालाचे विपणन आणि भविष्यातील संधी' या विषयावर एक चर्चासत्र घेण्यात आलं. या चर्चासत्रात तालुक्यातील पीक पद्धती, प्रमुख पिकांचं क्षेत्र आणि उत्पादन वाढ, विपणन व्यवस्था, कृषी उत्पन्न बाजार समितीमधील उपलब्ध पायाभूत सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत भविष्यातील नियोजन याबाबत चर्चा करण्यात आली.

**दिवाळी**

महिलांच्या सबलीकरणासाठी कार्यरत असलेल्या वंचित विकास संस्थेच्या वतीने महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या सहकार्याने 'आपली दिवाळी स्वदेशी दिवाळी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. या उपक्रमांतर्गत 1 ते 5 नोव्हेंबर दरम्यान प्रदर्शन भरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या संचालक मीना कुर्लेकर यांनी दिली. या विनामूल्य प्रदर्शनात पाचही दिवस विविध स्वरूपाचे कार्यक्रम होणार आहेत.

**हॅकेथॉन**

व्यवस्थापन विकास आणि संशोधन संस्था आणि राष्ट्रीय मनुष्यबळ विकास यांच्या वतीनं आज पुण्यात हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. वैविध्य, समानता, समावेशन आणि संबंधितता यातील समस्यांचं निवारण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. मुक्त वातावरण, दिव्यांग व्यक्तिंसाठी धोरणांची आखणी, कर्णबधीर आणि मूकबधीर व्यक्तिंना समान संधी मिळवून देणं, महिलांसाठी आर्थिक स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणं इत्यादी विषयांवर यामध्ये उपाययोजना सुचविण्यात आल्या.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र तर कमाल तापमान 33 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**